# शुद्ध व निर्भेळ दुधाचे उत्पादन

आपला देश एके काळी विपुल दह्या दुधाचा देश म्हणून ओळखला जात होता. परंतु ही मुबलकता, खास करून निर्भेळ दूध मिळण्याची उपलब्धता आता खूपच कमी झाली आहे. एकूण दुधाच्या उत्पादनांपैकी ७ टक्के दूध सूक्ष्मजंतूमुळे खराब होते. दुधाला आंबट वास येतो. इ. त्यामुळे टिकाऊ, चवदार व आरोग्यास उपयुक्त दुधाच्या उत्पादनासाठी कांही गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे. त्यासाठी

१) निरोगी जनावरे पाळणे.

२) गोठा व दूध काढण्याची जागा स्वतंत्र व स्वच्छ ठेवणे.

३) दूध काढण्याची व साठवण्याची भांडी स्वच्छ ठेवणे हे महत्त्वाचे आहे. दुधात घाण जाऊ नये म्हणून

१) दूध काढण्याची जागा स्वच्छ, भरपूर उजेडाची असावी.

२) तिथे धूळ, धूर असू नये.
३) दूध काढण्याच्या आधी गाईची व कासेची स्वच्छता करावी.

४) धार काढणाऱ्याने स्वच्छ कपडे घालावेत आणि हात साबणाने स्वच्छ करावेत. डोक्याला टोपी असावी.

५) दुध काढल्यानंतर साठवण्याच्या स्वच्छ भांड्यात गाळून भरावे. गाळण्यासाठी स्वच्छ, पातळ अशा पांढऱ्या कापडाचा वापर करावा. दूध आंबट होऊ देऊ नका – दुधात आम्लता उत्पन्न झाल्यास आंबट वास येतो त्यामुळे जंतूंचा प्रादुर्भाव होऊन दुधात आम्लता निर्माण होणार नाही यासाठी ते थंड जागी ठेवणे आवश्यक असते. त्याचे लवकरात लवकर वाटप होणे अत्यावश्यक आहे. भांडी धुताना घ्यावयाची काळजी– दूध काढण्याची व साठवण्याची भांडी शक्यतो मोठ्या तोंडाची असावीत म्हणजे ती स्वच्छ धुता येतात. भांड्यात दुधाचा अंश राहू नये म्हणून त्याचा वापर झाल्यावर ती स्वच्छ पाण्याने धुवावीत. भांडी धुण्यासाठी खाण्याचा सोडा गरम पाण्यात घालून त्याने धुवावीत. घासलेली भांडी स्वच्छ व कोरडी ठेवावीत. पुन्हा वापरण्यापूर्वी गरम पाण्याने धुऊन घ्यावीत. कासेची स्वच्छता– धार काढण्यापूर्वी कास कोमट पाण्याने स्वच्छ धुवावी, आणि कपड्याने कोरडी करावी. सुरुवातीच्या दोन–तीन धारा स्वतंत्र लहान भांड्यात काढाव्यात. कारण ह्या दुधात जंतूंचे प्रमाण जास्त असते. दूध काढल्यानंतर लगेच थंड करणे आवश्यक आहे. काढल्यानंतर दूध ३–४ तासाच्या आत वाटप करणे फायदेशीर असते. दूध आरोग्यदायक ठेवा– दुधामार्फत पटकी, विषमज्वर इत्यादी रोगांचा प्रसार होतो त्यामुळे आरोग्य न बिघडू देण्यासाठी खालील गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे. पशुवैद्यकांकडून आपले जनावर निरोगी आहेना याची वरचेवर तपासणी करून घ्यावी. कासेला होणाऱ्या बिघाडावर त्वरित उपाय करावा. स्वतः निरोगी धार काढणारा व दुध हातळणाऱ्याने स्वतःचे आरोग्य संसर्गजन्य रोगापासून मुक्त ठेवले पाहिजे. धार काढताना थुंकणे, खोकणे, खाजवणे, धूम्रपान करणे, अस्वच्छ कपडे घालणे हे टाळावे. स्वच्छ केलेल्या दुधापेक्षा स्वच्छ काढलेले दूध जास्त आरोग्यदायक असते.

◆

**व्ही. सी. नेरकर**